तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६१०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in

परिपत्रक

क्रमांक २/एनजीसी/परिपत्रक/२०१८/११७४

दिनांक : 31 AUG 2018

विषय : राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्याबाबत .

महाराष्ट्र राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना सुचित करण्यात येते की, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांमध्ये सद्यस्थितीत तीव्र स्पर्धात्मक युगामुळे ताण-तणाव व नैराश्याची भावना निर्माण होत असल्याची बाब संचालनालयाच्या निदर्शनास येत असल्याने, सर्व संस्थांनी त्यांच्या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांचे वेळोवेळी समुपदेश करण्यात यावे. यासाठी मार्गदर्शन व समुपदेशन सेलची स्थापना करण्यात यावी. विद्यार्थ्यांना येणा-या अडी-अडचणी लक्षात घेऊन त्यांच्या ताण- तणावाचे संस्थास्तरावर वेळीच निवारण करण्यात यावे. सांघिक चर्चासत्रे, मार्गदर्शनपर आणि स्फुर्तीदायक व्याख्याने, विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता पाठीस लागण्याकरीता शिबीरे यांचे आयोजन करण्यात यावे. जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य निरोगी राहून त्यांच्यामध्ये नैराश्याची भावना निर्माण होवू नये म्हणून संस्थास्तरावर सर्व ते प्रयत्न करण्यात यावेत. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा नियतकालिक अहवाल आपल्या संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करण्यात यावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

5514 11/9/18

१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय मुंबई यांना माहितीकरीता सादर.
२. तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपुर यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या सर्व संस्थांच्या निदर्शनास आणुन परिपत्रकाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देशित करण्यात यावे. परिपत्रकानुसार सर्व संस्थांनी अंमलबजावणी केल्याबाबतचा एकत्रित अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.
३. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २अ, १०, १६ यांना माहितीकरीता.
४. कार्यासन क्र.३ यांना माहिती व संकेतस्थळावर प्रसिध्दीकरीता.

पृष्ठांकन क्र.विकाअ/शिसव/2018/ 2208
सहसंचालक तंत्रशिक्षण वि.का. अमरावती
दिनांक : 14 SEP 2018

प्रत: ① प्राचार्य, सर्व संस्था अमरावती विभाग अमरावती यांना माहिती व आवश्यक केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करावा.
② प्रोग्रामर, तंत्र शिक्षण वि.का. अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता

सहसंचालक तंत्रशिक्षण
विभागीय कार्यालय, अमरावती.